प्रेस नोट ता. १८/०३/२०१९

**वाहन चोरीचा उच्चशिक्षीत म्होरक्या गजाआड असल्याने त्याच्या टोळीतील सदस्यांना पैश्याची टंचाई भासल्याने वाहने चोरुन विक्रीस निघालेल्या गुन्हेगाराच्या टोळीला हडपसर पोलीसांकडून अटक व अटक आरोपींकडून १३,०५,०००/- रुपये किंमतीची एकुण ३२ दुचाकी वाहने व इतर वाहनाचे सुटटे पार्ट जप्त**

पुणे शहरातील वाहन चोरी, जबरी चोरी व घरफोडी चोरीच्या गुन्हयास प्रतिबंध करुन, चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याकरीता मा. सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त सो, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली व मा. सुनिल देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त सो, हडपसर विभाग पुणे यांचे सुचनानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल तांबे यांचेकडून हडपसर पोलीस स्टेशनच्या हददीतील चोरीच्या गुन्हयास आळा बसविण्याकरीता विशेष मोहिम राबविण्यात आली आहे.

हडपसर पोलीस स्टेशनकडील तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी हे जबरी चोरी, घरफोडी चोरी, वाहन चोरी चोरीच्या गुन्हयांचा तपास करीत असताना पोलीस शिपाई अकबर शेख व पो. शि. ७३१७ मुंढे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी नामे १) अविनांश लिंबराज शिंदे वय २६ वर्षे रा.ढमाळवाडी, सोनाई शाळेच्या शेजारी, संजय हरपळे यांच्या चाळीत फुरसुंगी ता. हवेली, जि. पुणे, २) शौर्य रनपालसिंग चौधरी ऊर्फ पुलकीत वय २५ वर्षे रा. गोकुळनगर, गौरव शर्मा याच्या घरी, कात्रज रोड, कोंढवा पुणे, मुळगाव सिहानी नुर नगर, घर नं. ३०९ गाजीयाबाद, ३) मोहम्मदनबील इक्बाल शेख वय २० वर्षे रा. कृष्णा नगर, गल्ली नं. ०४, मश्जिदवाली गल्ली मोहम्मदवाडी हडपसर पुणे यांना हडपसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. २३४/२०१९ भादविक ३७९, ३४ या गुन्हयात दिनांक १६/०३/२०१९ रोजी १६.०० वाजता अटक केलेली आहे. त्यानंतर त्यांचेकडे केलेल्या चौकशी मध्ये ग व त्यांनी हडपसर पोलीस स्टेशन हददीतील ०६ गुन्हयातील मोटार सायकली, पुणे शहरातील इतर पोलीस स्टेशनच्या हददीतील १२ गुन्हयातील मोटार सायकली, पिंपरी चिंचवड आयुक्तालयाच्या हददीतील ०८ गुन्हयातील मोटार सायकली, पुणे ग्रामीण परिसरातील ०३ गुन्हयातील मोटार सायकली, सोलापूर ग्रामीण परिसरातील ०२ गुन्हयातील मोटार सायकली व परभणी जिल्हयातील ०१ मोटार सायकल अशा मोटार सायकली तपासात कबुल केले. त्यांचेकडून अदयापपावेतो ३२ मोटार सायकली जप्त करण्यात आल्या आहे.

अटक आरोपींकडुन हडपसर, वानवडी, मुंढवा, कोंढवा, चंदननगर, विश्रांतवाडी, वारजे माळवाडी, दत्तवाडी, सहकारनगर, बंडगार्डन, वाकड,सांगवी, भोसरी एमआयडीसी, चिखली, तळेगाव दाभाडे, चाकण व पुणे ग्रामीण लोणीकंद, बारामती शहर, पंढरपूर शहर, कुर्डवाडी, पोलीस स्टेशन कडील गुन्हे असे एकुण वाहन चोरीचे ३२ गुन्हे उघडकीस आणले व त्यांचेकडुन **एकुण १३,०५,०००/- रुपये किंमतीचा मूददेमाल** हस्तगत करण्यात आला आहे.

अटक आरोपीचा साथीदार आरोपी ४) गौरव राजकुमार शर्मा वय ३० वर्षे रा. राजमाता कॉलनी, राममंदीरा शेजारी, कोंढवा बुद्रुक पुणे, मुळगाव उत्तरप्रदेश हा खडक पोलीस स्टेशनच्या ताब्यात असुन खडक पोलीसांनी त्यांचेकडून एकुण ०७ गुन्हे उघडकीस आणले आहे. सदर आरोपीस हडपसर पोलीस स्टेशनकडील गुन्हयात वर्ग करुन घेत आहोत.

अटक आरोपी शौर्य हा गाजियाबाद,उत्तरप्रदेश याठिकाणी पेंटींग चा व्यवसाय करीत होता व मोहंम्मदनबील शेख हा मुळचा दिल्ली येथील असुन तो नाना पेठ,पुणे याठिकाणी मेकॅनिकचे काम करीत होता असे सांगुन त्यांना त्यांचा साथीदार गौरव शर्मा याने त्यांना जास्त पैश्याचे अमिष दाखविल्याने त्या अमिषाला बळी पडुन यांनी परप्रांतीय व स्थानिक आरोपीला हाताशी धरुन वाहनचोरीची टोळी तयार केली अटक आरोपींचा साथीदार आरोपी गौरव राजकुमार शर्मा हा उच्चशिक्षीत असुन त्यांने हॅाटेल मॅनेजमेंन्टचे शिक्षण घेतले आहे. मात्र झटपट पैसा कमाविण्याच्या हव्यासापोटी त्याने वरील साथीदारांच्या मदतीने वाहन चोरीची टोळी तयार केली. यापुर्वी त्याला चंर्तुःश्रृंगी, वाकड पोलीस स्टेशनकडील वाहन चोरीच्या गुन्हयात अटक केलेली आहे. चोरलेल्या वाहनाची विक्री करताना ते पोलीसांच्या जाळयात यापुर्वी अडकले. पोलीसांकडून अटक टाळण्यासाठी त्याने वाहन चोरीची टोळी बनवुन, चोरी केलेल्या वाहनाचे सुटटे पार्ट करुन विक्री करु लागला. त्यात त्याच्या मौजमजेसाठी त्याला पैश्याची कमतरता भासु लागल्याने त्याने अटक आरोपीतांच्या मदतीने चोरी केलेल्या वाहनाची थेट विक्री करण्याकडे तो पुन्हा वळाला. त्याचे साथीदार हे हडपसर पोलीस परिसरात चोरीचे वाहन घेवुन फिरत असताना गोपनीय बातमीनुसार मिळुन आल्याने तीन आरोपी यांना अटक करुन त्यांची पोलीस कस्टडीची रिमांड घेण्यात आली आहे.

सदरची कामगिरी मा. सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली मा. सुनिल देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त, हडपसर विभाग पुणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल तांबे, पोलीस निरीक्षक हमराज कुंभार यांचे सुचनानुसार सहा. पोलीस निरीक्षक संजय चव्हाण, सहा. पोलीस निरीक्षक लोणारे, पो.हवा. ८२३ युसुफ पठाण, पो. हवा. ५३८९ सोमनाथ सुतार, पो. हवा. ५५६२ राजेश नवले, पो. ना. २८०० प्रताप गायकवाड, पो. ना. ५८९४ प्रमोद टिळेकर, पो. ना. ६४८९ विनोद शिवले, पो. ना. ६८७० सैदोबा भोजराव, पो. ना. ५७९१ राजु वेगरे, पो. ना. ५८५३ गणेश दळवी, पो. शि. ७३१७ नितीन मुंढे, पो. शि. ८६९२ अकबर शेख, पो. शि. ७५१२ गोविंद चिवळे, पो. शि.७६८४ शंशिकांत नाळे,पोशि कांबळे यांनी केली आहे.

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक,**
**हडपसर पोलीस स्टेशन, पुणे**

Pune Police

| पिंपरी चिंचवड आयुक्तालयकडील उघडकीस आलेले गुन्हे |
| --- |
| १९) सांगवी पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ४०३ /२०१८ भादविक ३७९<br>२०) तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ९५ /२०१९ भादविक ३७९<br>२१) तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ४७३/२०१७ भादविक ३७९<br>२२) चिखली पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ९५ /२०१८ भादविक ३७९<br>२३) एमआयडीसी भोसरी पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ४९६ /२०१८ भादविक ३७९<br>२४) वाकड पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. २५८/२०१७ भादविक ३७९<br>२५) पिंपरी पोलीस स्टेशन तक्रारी अर्ज<br>२६) चाकण पोलीस स्टेशन तक्रारी अर्ज |
| **पुणे ग्रामीण हददीतील उघडकीस आलेले गुन्हे** |
| २७) लोणीकंद पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. १७८/२०१९ भादविक ३७९<br>२८) लोणीकंद पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ४६०/२०१६ भादविक ३७९<br>२९) बारामती शहर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ३७६/२०१७ भादविक ३७९ |
| **सोलापूर ग्रामीण हददीतील उघडकीस आलेले गुन्हे** |
| ३०) कुर्डवाडी पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ४८०/२०१६ भादविक ३७९<br>३१) पंढरपुर शहर पोलीस स्टेशन तक्रारी अर्ज<br>३२) परभणी ग्रामीण पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ४५/२०१८ भादविक ३७९ |

**हडपसर पोलीस स्टेशनकडील पोलीसांनी उघडकीस आणले गुन्हे खालील प्रमाणे**

| परिमंडळ ५ कडील उघडकीस आलेले गुन्हे |
| --- |
| १) हडपसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. २३४ /२०१९ भादविक ३७९<br>२) हडपसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. २२६ /२०१९ भादविक ३७९<br>३) हडपसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. २३७ /२०१९ भादविक ३७९<br>४) हडपसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. २४६ /२०१९ भादविक ३७९<br>५) हडपसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. २५५ /२०१९ भादविक ३७९<br>६) हडपसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ७८४ /२०१६ भादविक ३७९<br>७) वानवडी पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. १३५ /२०१९ भादविक ३७९<br>८) वानवडी पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. १३० /२०१९ भादविक ३७९<br>९) वानवडी पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. १२५ /२०१९ भादविक ३७९<br>१०) कोंढवा पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. २०५ /२०१९ भादविक ३७९<br>११) कोंढवा पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. १९३ /२०१९ भादविक ३७९<br>१२) मुंढवा पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ९०/२०१९ भादविक ३७९ |
| **परिमंडळ ४ कडील उघडकीस आलेले गुन्हे** |
| १३) चंदननगर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. १०२ /२०१९ भादविक ३७९<br>१४) विश्रांतवाडी पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. १३६ /२०१२ भादविक ३७९ |
| **परिमंडळ ३ कडील उघडकीस आलेले गुन्हे** |
| १५) वारजे माळवाडी पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. २१८ /२०१६ भादविक ३७९ |
| **परिमंडळ २ कडील उघडकीस आलेले गुन्हे** |
| १६) बंडगार्डन पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ०२ /२०१९ भादविक ३७९<br>१७) दत्तवाडी पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ४१० /२०१८ भादविक ३७९<br>१८) सहकार नगर पोलीस स्टेशन ऑनलाईन तक्रारी अर्ज |


पुणे शहर पोलीस आयुक्तालय